# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** कुंटूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0109 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/07/2024 17:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 02/07/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/07/2024
**Time From (वेळेपासून):** 12:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/07/2024 **Time (वेळ):** 17:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/07/2024 17:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 18 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सोमठाणा ,नायगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गोविंद जयसिंगराव वाघमारे
**(b) Father's/Husband's Name (वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड , मतदाता कार्ड , पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हाडको नांदेड,नांदेड ,कुंटूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हाडको नांदेड,नांदेड ,कुंटूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 मनोहर पुंडलीकराव पवार | | | 1. सोमठाणा,, ता नायगाव,कुंटूर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बहिनाजी वरवंटे | | | 1. रा लोहगाव,,रा लोहगाव,कुंटूर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 03/07/2024
फिर्याद

मी गोविंद जयसिंगराव वाघमारे, वय 48 वर्ष, व्यवसाय सहशिक्षक रा.हडको ता.जि.नांदेड मोबाईल क्र 9822814328
समक्ष पोलीस स्टेशन कुंटूर येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे रहाणारा असुन शंकर कनिष्ठ महाविद्यालय, कौठा, नांदेड येथे सहशिक्षक आहे.

काल दिनांक 02/07/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयात येथे समक्ष हजर येवुन तक्रार दिली होती कि, माझी मुलगी संजना गोविंद वाघमारे ही मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा, ता. नायगाव, जि. नादेड यामध्ये शिक्षण घेत होती. सदर महाविद्यालय हे 12 वी पर्यंत आहे. तरी माझी मुलगी ही सन 2023-24 या वर्षात 12 वी विज्ञान शाखेमधून उत्तीर्ण झाली आहे. तरी यातील नमूद मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा, ता. नायगाव, जि. नादेड हे शासकीय अनुदानीत विद्यालय आहे.

दि. 24/06/2024 रोजी मी मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा, ता. नायगाव, जि. नादेड येथे मुलगी संजना हीचे 12 वी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी 12 वी उत्तीर्णची टी.सी. घेण्यासाठी गेलो. त्यावेळी सदर महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वरवंटे सर यांना भेटलो आणि टी.सी. ची मागणी केली. त्यावेळी मुख्याध्यापक श्री वरवंटे सर यांनी मला सांगितले आहे की, तुम्हाला काही सामान आणून द्यावे लागेल, त्यानंतरच टी.सी. देण्यात येईल. त्यावेळी मी त्यांना सदर सामान कशासाठी विचारले असता, त्यांनी सदरचे सामान संस्थाचालक श्री मनोहर पवार यांनी सांगितले आहे असे म्हणाले. तेवढयात संस्थाचालक श्री पवार सर आल्याने मला मुख्याध्यापक श्री वरवंटे सर यांनी त्यांचेकडे पाठविले. तेव्हा मी संस्थाचालक श्री मनोहर पवार सर यांना भेटून माझी मुलगी संजना हीची 12 वी पासची टी.सी. देण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी मला कुलर द्या आणि टी.सी. घेवून जा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना कोणता कुलर असे विचारले असता त्यांनी मला 12,000/- रूपये किंमतीचा सिम्पनी कंपनीचा कुलर आहे ते देवून टाका असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सर खुप जास्त होतात असे म्हणालो. कोणत्याही प्रकारची देगणी अथवा वस्तू शाळेस दयायची इच्छा नसलेने मला माझे मुलीची टी. सी. द्या अशी विनंती केली परंतु त्यांनी मला कुलर दिल्यानंतरच टी.सी मिळेल असे सांगितले.
माझी मुलगी संजना हीची 12 वी उत्तीर्णची टी.सी. देण्यासाठी संस्थाचालक श्री पवार व मुख्याध्यापक श्री वरवंटे यांनी माझेकडे मागणी केलेले सामान सिम्पनी कंपनीचा कुलर ही कोणतीही शासकीय फिस नसून लाच आहे याची मला खात्री झाल्याने व नमूद लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी या बाबत वगैरे मजकुराची सविस्तर तक्रार दिली होती.
सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 02/07/2024 रोजी पोउपअ श्री प्रशांत पवार यांनी लाप्रवि, कार्यालय,नांदेड येथे दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवुन माझी ओळख करून दिली व मला पंचा समक्ष तोंडी तक्रार सांगण्यास कळविले असता मी वरील प्रमाणे तोंडी तक्रार सांगीतली दोन्ही पंचानी तोंडी व लेखी तक्रार सारखीच असल्याची खात्री करून मी तक्रारदार व दोन्ही पंचानी तसेच पोउपअ श्री पवार यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर माझा व सापळा पथकातील सर्व सदस्यांचा परिचय करून दिला तसेच मला व दोन्ही पंचाना सापळा कार्यवाहीचा उद्देश सांगितला. त्यानंतर आम्ही शासकिय वाहनाने सोमठाणा गावाचे जवळ आलो.तेथे माझे स्वतःचे, पोउपअ श्री पवार यांचे व दोन्ही पंचांचे परिचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोउपअ श्री पवार यांनी मुख्याध्यापक श्री वरवंटे व संस्थाचालक श्री मनोहर पवार यांची भेट घेण्याच्या अगोदर मला दोन्ही पंचाना व पोकॉ/जाधव यांना योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन माझे सोबत शासकीय पंच-1 श्री मुनेश्वर यांचेसह वेळ 12.45



Scanned with CamScanner

वाजे दरम्यान मुख्याध्यापक श्री वरवंटे व संस्थाचालक श्री मनोहर पवार यांची भेट घेण्यासाठी मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी केली असता मुख्याध्यापक श्री वरवंटे यांच्याकडे माझे मुलीच्या 12 वी पास ची टि.सी बाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी सागितले की तुमच्या मुलीची टि.सी माझ्याकडे नाही ते संस्थाचालक श्री पवार साहेब यांच्याकडे आहे. तेव्हा मी म्हणालो की, पवार सर कुलरची मागणी करीत आहेत. तेंव्हा वरवंटे सर म्हणाले की तुम्ही काय बी दया,त्यावर मी म्हणालो की, 12 हजार रूपयाचे कुलर खुप महाग होत आहे. तेव्हा वरवंटे हे मला म्हणाले की आपण पवार सरांना फोन लावून बोला. तेव्हा मी संस्थाचालक श्री पवार सर यांना फोन लावला. तेव्हा त्यांनी माझा फोन उचलला नाही. त्यांनतर लगेच संस्थाचालक पवार सर यांचा फोन आला. तेव्हा मी सागितले, सर मी वाघमारे माझ्या मुलीची टि.सी मिळण्याकरीता आलो आहे, शाळेत तेव्हा श्री पवार हे म्हणाले काही आणल्या काय? तेव्हा मी म्हणालो, काय आनाव लागते साहेब, तेव्हा श्री पवार हे म्हणाले पगार झाली काही तरी दया, तिन हजार रूपये दया,त्यावर मी म्हणालो,तीन हजार रूपये दयायचे काय त्यावर पवार हो म्हणाले. तेव्हा मी विचारणा केली कोणाकडे दयायचे? तेव्हा संस्थाचालक पवार यांनी सांगितले की प्राचार्य वरवंटे यांच्याकडे दया व प्राचार्य यांना मला फोन लावायला सांगा. तेव्हा मुख्याध्यापक वरवंटे यांनी त्यांचे स्वतःचे मोबाईलवरून संस्थाचालक श्री पवार यांना कॉल केला व टि.सी बाबत बोलले, त्यांनतर वरवंटे यांनी मला सागितले की तुमच्या कडून तीन हजार रूपये घ्या व त्यांनतर टि.सी कुठे आहे असे सागितले तेव्हा मी वरवंटे सर यांना मी अर्धा तासाल पैसे घेवून येतो असे बोलून त्या ठिकाण वरून निघून परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी मी व पंच क्र.1 असे 13.03 वाजता हजर आलो.

त्यांनतर पोउपअ श्री पवार सर यांनी मला व पंच क्र. 1 विचारणा केली व लाच मागणी पडताळणी झाल्याची श्री पवार सर व पथकाची खात्री झाल्याने सापळा कार्यवाही करण्याचे नियोजत ठरविले. त्यानंतर मुख्याध्यापक तथा प्राचार्य वरवंटे हे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार असल्याने सापळा अधिकारी पो उप अधि श्री पवार यांनी लोकसेवक वरवंटे यांनी मला लाच मागणी पडताळणी वेळी मागणी केलेले 3000/- रूपये लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली असता मी माझेकडील रक्कम हजर केली. त्यानंतर सापळा आयोजित करण्यापूर्वी नियोजीत जागी शासकीय वाहनात सापळापूर्व कार्यवाही केली. ज्यात मला व दोन्ही पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगीतले. माझी अंगझडती घेवुन अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अँथ्रासीन पावडर यांच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक पंच क्र.2 यांनी एका कागदावर लिहुन घेवुन लाचेच्या रक्कमेला पोकॉ अरषद यांनी अँथ्रासीन पावडर लावले व सदर रक्कम माझे अंगावरील नेसनीस असलेल्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुचे खिशात डायरीत ठेवले व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन तशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही करून घेतली व पोउपअधि श्री पवार यांनी मला व दोन्ही पंचाना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.

वेळ 14:44 वाजता मला व पंच क्र. 1 यांना माझे स्कुटी क्रमांक एम एच 26 ए वाय 8163 ने शाळेचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविले. मी व पंच क्र-1 असे मुख्याध्यापक वरवटे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यसाठी मुख्याध्यापकाचे कार्यालयात गेलो. त्यावेळी त्यांनी कार्यालयात नव्हते. त्यांना फोन केला असता त्यांनी मला दुसरे काम आहे असे म्हणुन फोन ठेवून दिला. असे म्हणाल्याने आम्ही शाळेच्या बाहेर लाच स्विकारल्याचा इशारा न करता येवुन माझे स्कुटीने नियोजीत जागेवर 15.42 वाजता येवून थांबलो. तेथे पोकॉ इश्वर जाधव यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्ड घेवुन बंद केला. तेथे पोउपअ श्री पवार यांनी मला सापळा पथका पासुन रवाना होवुन परत येई पर्यन्त काय घडले या बाबत विचारणा केली.

आज रोजी सकाळी सोमठाणा गावाजवळ नियोजीत जागी मी व पोलीस उप अधीक्षक श्री. पवार व सापळा पथक असे मुख्याध्यापक यांनी काल मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी 11.04 वा पंच क्र.1 यांना माझे स्कुटी क्रमांक एम एच 26 ए वाय 8163 ने शाळेचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविले. त्यावेळी आम्ही ऑफिस मधील संस्थाचालक यांचा मुलगा यास मुख्याध्यापक सर नाहीत काय? असे विचारले असता त्याने वरवटे सर हे सुट्टीवर आहेत. तेव्हा मी त्याला संस्थाचालक साहेब कुठे आहेत असे विचारले असता साहेब दोन दिवस झाल नाहीत, बाहेरच्या कामासाठी गेलेत. काही काम असेल तर कदम सराकडून करून घ्या असे म्हणाले. त्यावर मी म्हणालो त्यांच्याकडे काम नाही मी मुख्याध्यापक सरला बोलतो असे म्हणालो. मी मुख्याध्यापक सर यांना फोन करून मी इथ कॉलेजला आलो असे म्हणालो असता टि.सी. घेवून जा असे म्हणाले व मी रजेवर आहे. टि.सी. कोणाकडे आहे विचारले असता तिथे कारकुन आहे सिरसे सर ला विचारा असे म्हणाले. तेव्हा मी संस्थाचालक सर यांना फोन केला असता ते मला म्हणाले की प्राचार्य आहेत का? असे विचारले तेव्हा मी त्यांना प्राचार्य सुटीवर आहेत असे सांगितले त्यावर ते मला म्हणाले की ऑफिस मधुन टि.सी. घेवून जा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना काल तुम्ही पैसे मागीतले होते ते कोणाकडे देवु असे विचारले असता त्यांनी टि.सी घेवुन जा असे म्हणत फोन ठेवुन दिला आहे.



Scanned with CamScanner

त्यामुळे आम्ही शाळेच्या बाहेर लाच स्विकारल्याचा इशारा न करता येवुन माझे स्कुटीने नियोजीत जागेवर 11.36 वाजता येवून थांबलो. तेथे पोकॉ ईश्वर जाधव यांनी माझे जवळील डिजिटल व्हाईस रेकॉर्ड घेवुन बंद केले. तेथे पोउपअ श्री पवार यांनी मला सापळा पथका पासुन रवाना होवुन परत येई पर्यन्त काय घडले या बाबत विचारणा केली. तेव्हा मी त्यांना वरील प्रमाणे हकीगत सांगितली.
तरी काल दि. 02/07/2024 रोजी माझ्या मुलीची टि.सी. मिळविण्याकरीता विदया विकास शिक्षण प्रसारक मंडळचे मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणाचे संस्थाचालक श्री मनोहर पवार यांनी मला पंचा समक्ष स्पष्ट 3000/- रूपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री बहिनाजी वरवंटे यांचेकडे देण्यास सांगितले तसेच मुख्याधापक श्री वरवंटे यांचेकडे मुलीच्या टीसी ची मागणी केली असता त्यांनी देखील तुम्ही पवार यांनी सांगितले प्रमाणे तुम्ही 3000/- रू. दया त्यानंतर टि.सी कुठे आहे हे सांगतो तसेच काही बी दया असे म्हणून लाचेची मागणी केली व गुन्हयास प्रोत्साहन दिले.म्हणुन माझी त्यांच्या विरूध्द कलम 7 व 12 भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

समक्ष

गोविंद जयसिंगराव वाघमारे,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
RAKRUSHNA SHREEHARI PATIL (SI (Sub-Inspector)) / BAKPAT1983107 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

F.I.R. ची एक प्रत मिळाली



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पालीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन कुंद्र

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAKRUSHNA SHREE
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** RAKPAT1983107



Scanned with CamScanner